अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. १२ ऑक्टोबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## हिट मॅनने केले तीन विश्वविक्रम



सर्वाधिक षटकार
५५४

विश्वचषकात सर्वाधिक
७ शतके

विश्वचषकात सर्वाधिक
जलद हजार धावा

**पहिला विश्वविक्रम :** रोहित शर्मांने या सामन्यात रोहित शर्मांने जगातील सर्वात मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. आतापर्यंत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार लगावण्याचा पराक्रम त्याने केला. यापूर्वी हा वर्ल्ड रेकॉर्ड हा वेस्ट इंडिजचा फलंदाज ख्रिस गेल (५५३) याच्या नावावर होता. रोहितने अफगाणच्या सामन्यात षटकारांची बरसात केल त्याचे ५५४ षटकार झाले आहेत.

**दुसरा विश्वविक्रम :** शर्मांने यावेळी सचिन तेंडुलकरला पिछाडीवर सोडत दुसरा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. यापूर्वी वर्ल्ड कपमध्ये सर्वात जलद १००० धावा करण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड तेंडुलकरच्या नावावर होता. त्याने २० डावांमध्ये वर्ल्ड कपमध्ये आपल्या १००० धावा पूर्ण केल्या होत्या. शर्मांने या सामन्यात १००० धावांचा टप्पा गाठला आहे.

**तिसरा विश्वविक्रम :** रोहित शर्मांने या सामन्यात विश्वविक्रमी शतक झळकावल्याचे पाहायला मिळाले. यापूर्वी वर्ल्ड कपमधील सर्वाधिक शतकांचा (६) विश्वविक्रम हा सचिन तेंडुलकरच्या नावावर होता. या सामन्यात रोहितने विश्वचषकातील ७ वे शतक झळकावले. त्याचबरोबर वर्ल्ड कपमध्ये सर्वात जलद शतक झळकावण्याचा मानही यावेळी रोहितच्या नावावर जमा झाले आहे. यापूर्वी हा विश्वविक्रम कपिल देव यांच्या नावावर होता.

### उळे गावाजवळ मध्यरात्रीचा थरार...

# शस्त्रे घेवून दरोडा टाकायला निघाले पोलिसांच्या जाळ्यात अखेर सापडले

▸▸ १३ दरोडेखोरांवर गुन्हा ५ जणांना अटक

▸▸ रोख रकमेसह ५ लाख ७० हजाराचा माल जप्त

✔ सुराज्य/सोलापूर


**दरोडा टाकण्यासाठी निघालेल्या क्वालीस मोटारीवर ग्रामीण पोलिसांच्या पथकाने धाड टाकून ५ जणांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम, दरोडाचे साहित्य आणि वाहन असा एकूण ५ लाख ६९ हजारांचा माल पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणात सोलापूर तालुका पोलिसांनी १३ जणांविरुद्ध दरोडा टाकण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला. अटकेतील पाच जणांना ५ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने बुधवारी दिला आहे. ही कारवाई मंगळवारी रात्रीच्या सुमारास उळे (ता.दक्षिण सोलापूर) येथील होनसळ पाटीजवळ करण्यात आली.**

राजबहादुर चंद्रबहादुर कामी (वय २३) दीपक बहादुर दमाई (वय २२ दोघे रा. अंबोली अंधेरी,वेस्ट मुंबई),मुरसलीम शेख (वय ३४), इमामूल शेख (वय १९ दोघे रा. झारखंड) आणि सुरज नजीर उलहक (वय ३४ रा.पश्चिम बंगाल) अशी अटकेतील संशयीत दरोडेखोरांची नावे आहेत. त्यांना १६ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने आज दिला.तर मोहम्मद शेख, कमलुद्दीन शहाजल, इंदमुलूक शेख, शिवलिंग देवल, टीकाराम कोली, विक्रमसिंग नेगी आणि बरसाउत अरकसावत अशा ८ जणांची नावे निष्पन्न झाली असून ते मात्र फरार आहेत.

यासंबंधी ग्रामिण पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, टोयाटो क्वालीस मोटारीतून काही संशयित दरोडेखोर हे तुळजापूर मार्गे लातूरच्या दिशेने दरोडा टाकण्याच्या तयारीत जात असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली. त्याप्रमाणे सहाय्यक निरीक्षक इज्जपवार आणि फौजदार सुबोध जमदाडे यांच्या पथकाने तुळजापूर रोडवरील उळे येथे मंगळवारी मध्यरात्री सापळा लावला. त्यावेळी एमएच०६-डब्लू-५१०० या क्रमांकाची टोयोटो मोटार तुळजापूरच्या दिशेने जात असल्याचे पोलिसांना दिसून आले. पोलिसांनी वाहन अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र वाहन न थांबता तसेच पुढे गेले. पोलिसांनी पाठलाग करून होनसळ पाटीजवळ वाहन अडवले. तेव्हा त्यात ५ आरोपी आढळून आले.



पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता वाहनात कटर, हातोडा, दोरी, गॅस कटर, चाकू, कोयते, ऑक्सिजनचे सिलेंडर आदी दरोड्याचे साहित्य आढळले. तर आरोपींकडे ३० हजारांची रोकड आढळली. पोलिसांनी त्यांना अटक केली. त्यावेळी अटकेतील आरोपींनी लातूर आणि उदगीर परिसरात दरोडा टाकण्यासाठी अन्य आरोपींसह निघाल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणात पोलिसांनी एकूण १३जणांविरुद्ध सोलापूर तालुका पोलिसात गुन्हा दाखल केला. अन्य ८ आरोपींची नावे निष्पन्न झाली असून त्यांना लवकरच अटक करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक इज्जपवार करीत आहेत.



## ज्वेलर्सचे दुकान फोडून अडीच लाखांचा ऐवज लंपास

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील पूर्व भागातील बालाजी ज्वेलर्स हे सराफ दुकान फोडून चोरट्यानं दोन किलो चांदी आणि सोन्याचे दागिन्यांवर डल्ला मारल्याची बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास नीलम नगर येथे घडली. हि गुरुवारी सकाळच्या सुमारास ही घटना उघडकीस आली.

बालाजी ज्वेलर्सचे मालक विनोद मुरलीधर संचू (रा. न्यू पाच्छा पेठ,सोलापूर) यांचे नीलम नगर भागात बालाजी ज्वेलर्स नावाचे दुकान असून, नेहमीप्रमाणे रात्री ते दुकान बंद करून घरी गेले असताना मध्यरात्री दोनच्या सुमारास




अज्ञात चोरट्याने दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश करत सोन्या-चांदीचे जवळपास २ लाख ५४ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला.एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज मिळाल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने यांनी सांगितले.

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील घटस्थापनेच्या मुहूर्तावर सोलापुरात

### रविवारी कार्यकर्त्यांना भेटणार; सोमवारी प्रशाकीय कामांचा आढावा घेणार

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्याचे नूतन पालकमंत्री चंद्रकांत पाटील पहिल्यांदा सोलापूर दौऱ्यांवर येत आहेत. घटस्थापनेचा मुहूर्तावर दोन दिवस सोलापूर दौऱ्यांवर येणार आहेत. रविवार १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी शहरार आगमन होणार आहे.

सोमवारी जिल्हानियोजन भवन येथे सोलापूर जिल्ह्यात निर्माण झालेल्या संभव्य पाणी टंचाई, शहराच्या पाणी पुरवठा आणि उड्डाण पूल, उजनीच्या पाण्याचे नियोजन यासंदर्भात आढाव बैठक घेणार आहेत.

राज्य सरकारने नवीन पालकमंत्र्यांची यादी जाहीर केली आहे. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्रीपदी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची वर्णी लागली आहे. सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्री नियुक्ती झाल्यानंतर चंद्रकांत पाटील सोलापूर दौऱ्यावर प्रथमच येत आहेत. १५ ऑक्टोबर रविवार घटस्थापनेचा मुहूर्त पाटील यांनी शोधला आहे. रविवार रोजी सायंकळी ६ वाजता सोलापूर शहरात आगमन होणार आहे. शासकिय विश्रामगृह येथे पालकमंत्र्याचे भाजपच्या वतीने जंगी स्वागत केले जाणार आहे. त्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहे. रात्री मुक्काम



त्यानंतर सोमवार सकाळी १० वाजल्यापासून जिल्हानियोजन भवन येथे सोलापूर जिल्ह्यात निर्माण झालेल्या संभव्य पाणी टंचाईचा प्रथम आढावा घेणार आहेत. त्यानंतर आलमट्टी आणि उजनीच्या पाण्याचे नियोजन सोलापूर शहातील समांतर जलवाहनी, प्रस्तावित दोन उड्डाण पूल, पीक विमा यांचा आढावा घेणार आहेत. यासाठी बुधवारी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे ओएसडी बाळासाहेब यादव सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यांनी भाजपचे माजी शहराअध्यक्ष विक्रम देशमुख, मनोहर डांगरे यांच्या उपस्थित जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन, मुख्यमंत्री सचिवालय कक्षाची पाहणी केली. त्यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांच्या दालनात जाऊन विकाद कामासंदर्भात चर्चा करून माहिती घेतली.

## महिलेच्या पर्समधील १ लाखाच्या दागिन्यांवर डल्ला

### उद्यान एक्सप्रेसमधील घटना

✔ **कुर्डूवाडी :** मुंबई-बंगळुरू उद्यान एक्सप्रेसमधून कुर्डुवाडी ते कर्जत प्रवास करत असताना असताना महिलेच्या पर्समधील सुमारे १ लाख १२ हजाराचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले.

ही घटना सोमवार दि. ९ ऑक्टोबर रोजी दुपारी १२.३५ ते १ वाजण्याच्या सुमारास कुर्डुवाडी ते केम रेल्वे स्टेशनच्या दरम्यान घडली. तमन्ना उमर मुलाणी (वय २१ रा.सांगोला) यांनी कुर्डुवाडी लोहमार्ग पोलिसांत याबाबत फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादी त्यांच्या सासू-सासऱ्यासह सोमवार दि. ९ रोजी सांगोला येथून कर्जत येथे जाण्यासाठी मिरज -कुर्डुवाडी डेमू गाडीने कुर्डुवाडी रेल्वे स्थानकात आले होते. दरम्यान केम रेल्वे स्थानक आल्यानंतर फिर्यादीने आपली पर्स तपासली असता त्यांनी पर्सच्या आतील कप्प्यामध्ये ठेवलेले ६० हजार रुपये किंमतीचे १५ ग्रॅम वजनाचे नेकलेस, ३२ हजार रुपये किंमतीचे ८ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र, २० हजार रूपये किंमतीची ५ ग्रॅम वजनाची सोन्याची बोरमाळ असे एकूण १ लाख १२ हजारांचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने मोठ्या शिताफीने गर्दीचा फायदा घेऊन पर्सची चेन उघडून लंपास केले.

## मंद्रूप जवळच्या अपघातात एकाचा मृत्यू

✔ सुराज्य/द.सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील येळेगाव-मंद्रूप रस्त्यावर झालेल्या अपघातात मंद्रूप येथील एका मोटार मेकॅनिकचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली.

दिगंबर शिवाजी नवले (वय ५४,राहणार,मंद्रूप) असे मृत्यू झालेल्या व्यक्तींचे नांव आहे. याबाबत माहिती अशी की दिगंबर नवले यांचे येळेगाव रस्त्याकडे शेती आहे.सायंकाळी सात वाजणाच्या दरम्यान ते शेतावरून मंद्रूप कडील आपल्या घराकडे येत होते यावेळी प्रभाकर टेळे यांच्या वस्ती जवळच्या परिसरात ते लघुशंकेसाठी थांबले होते यावेळी लघुशंका उरकून ते आपल्या दुचाकिकडे येत असताना भरधाव वेगाने येळेगावकडे जाणाऱ्या छोटा हत्ती टेम्पोने त्यांना उडविले. यावेळी नवले हे जोरदारपणे रस्त्यावर आपटले. यात त्यांच्या डोक्यात जबर मार लागल्याने ते गंभीर जखमी झाले यावेळी त्यांना उपचारासाठी मंद्रूपच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्यांचे उपचार पूर्वीच निधन झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.अशी माहिती त्यांच्या नातेवाईकांनी प्रसारमाध्यमांना दिली आहे. दिगंबर नवले यांच्या पक्षात आई, पत्नी, एक मुलगा आणि दोन मुली असा परिवार आहे. बुधवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अनेक प्रयत्नांनी सुद्धा खूप नोटा शिल्लक राहिल्यात!

| कल्याण |
| --- |
| 178-67-467 |

| मुंबई |
| --- |
| 580-39-144 |

## भारताचा अफगाणवर दणदणीत विजय

✔ **नवी दिल्ली :** विश्वचषकातील दुसऱ्या सामन्यात टीम इंडियाने अफगाणिस्तानचा ८ विकेट्सने पराभव केला. अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकात ८ गडी गमावून २७२ धावा केल्या. कर्णधार हश्मतुल्ला शाहिदीने ८० धावांची तर अजमतुल्ला उमरझाईने ६२ धावांची खेळी खेळली. प्रत्युत्तरात भारताने केवळ ३५ षटकांत दोन गडी गमावून लक्ष्य गाठले. कर्णधार रोहित शर्मांने ८४ चेंडूत १६ चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने १३१ धावांची खेळी केली.

## दोन वैद्यकीय अधिकारी-मुख्याध्यापकावर कारवाई होणार : सीईओ

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, तिऱ्हे व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तिऱ्हे (ता. उत्तर सोलापूर) येथे भेट देऊन कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या उपस्थितीची पाहणी केली. तसेच परिसर स्वच्छतेची पाहणी केली. रुग्णांना देण्यात येणाऱ्या सुविधांची त्यांनी पाहणी केली. कर्तव्यात कसूर केलेल्या दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांवर व एका मुख्याध्याकावर कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला.

त्यावेळी आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी उपस्थित असल्याचे निदर्शनास आले. संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी गोडसे हे




विनापरवाना रजेवर असल्याचे दिसून आले. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषध साठा नोंदवही उपलब्ध नव्हती. त्यामुळे गोडसे, वैद्यकिय अधिकारी व श्रीमती राऊतराव वैद्यकिय अधिकारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याबाबतचे निर्देश जिल्हा आरोग्य अधिकारी यांना देण्यात आले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तिऱ्हे येथे भेट दिली असता सर्व शिक्षकांची उपस्थितीची पाहणी करण्यात आली. तीन शिक्षक रजेवर असल्याचे निदर्शनास आले. इयत्ता ५ वीच्या वर्गामधील विद्यार्थ्यांशी संवाद साधला असता विद्यार्थ्यांचे ज्ञानार्जनाचे आकलन चांगले असल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांना चांगले ज्ञानार्जन करून उज्वल भविष्य घडविण्याच्या शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांना देण्यात येणारा शालेय पोषण आहार अंतर्गत शिजविलेल्या मध्यान्ह भोजनाचा आहाराची चव घेतली असता साधरण असल्याचे दिसून आल्यामुळे सुधारणा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. संबंधित अभिलेखाची पडताळणी केली असता आहार साठा नोंदवही उपलब्ध झाली नाही.

# उजनी थांबली, काळजी वाढली

## येत्या काळात 'पाणीबाणी'चे संकट


✔ सुराज्य/टेंभुर्णी

सोलापूर, पुणे व अहमदनगर जिल्ह्यांची वरदायिनी असलेल्या उजनी धरणातील पाण्याची पातळी यंदा ६१ टक्क्यांवरच स्थिरावणार असे दिसत आहे. सध्या पाणी पातळी ६०.४७ टक्क्यांवर स्थिर झाली आहे. दौंड येथून जलाशयात येणारा विसर्ग अत्यंत कमी म्हणजे फक्त १ हजार २५४ क्युसेक्स राहिलेला आहे. धरणात ९६.०५ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. उजनीच्या वरील २० पैकी १६ धरणे मात्र शंभर टक्के पूर्ण क्षमतेने भरली आहेत. ४० टक्के पाणी देवून उजनी १०० टक्के करण्यास पुणेकर मदत करणार काय? असा प्रश्न सोलापूर जिल्ह्यामधून विचारला जावू लागला आहे.

दौंड येथून उजनीत येणारा विसर्ग मागील पाच-सहा दिवसांपासून सातत्याने घटत चालला आहे. त्यामुळे मागील २४ तासात धरणाच्या जलसाठ्यात केवळ ०.१७ टीएमसी पाण्याची भर पडली असून, टक्केवारी ६०.४७ झाले आहे, तर एकूण जलसाठा ९६.०५ टीएमसी एवढा झाला आहे. उपयुक्त साठाही ३२.४० टीएमसी झाला आहे.

१५ ऑक्टोबर हा शासकिय पावसाळ्याचा अखेरचा दिवस असतो, परंतु यानंतर देखील मोठे पाऊस होऊन यापूर्वी काही वेळेस धरणातील पाणीसाठ्यात नियोजित १०० टक्के वाढ झालेली आहे. यामुळे आगामी काही दिवसात पुन्हा चांगला पाऊस झाल्यास ऑक्टोबर २०२३ अखेरपर्यंत उजनीत पाणी साठा वाढू शकतो. पण हे खात्रीशीर नसल्याने उजनीचा पाणी साठा ६१ वरच स्थिर राहतो की काय? अशी भीती व्यक्त केली जात आहे.

सप्टेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात दमदार पाऊस झाल्याने उजनीचा जलसाठा झपाट्याने वाढत गेला मात्र मागील दहा दिवसांपासून पावसाने पुन्हा विश्रांती घेतल्याने बंड गार्डन व दौंड येथून उजनीत



येणाऱ्या विसर्गामध्ये घट होत गेली. बुधवारी सकाळी दौंड येथून १हजार २५४ क्युसेकने विसर्ग येतो आहे. त्यामुळे या विसर्गामुळे उजनी फार तर ६१टक्क्यांपर्यंत जावू शकते. त्यानंतर पुढे होणारी वाढ थांबणार आहे. मात्र अद्याप २७ टीएमसी पाणी व ५१ टक्के पाणीसाठा कमी असून ४३ वर्षात अपेक्षित पाणीसाठा न झाल्याची ही नववी वेळ आहे. उजनीची संथगतीने चालू असलेली वाढ आता थांबण्याच्या मार्गावर आहे. आता भविष्यात पाणीटंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सोलापूर जिल्ह्याच्या कृषी, आर्थिक, सहकार व राजकीय क्षेत्रात अनन्यसाधारण महत्त्व असलेले उजनी धरण चालू वर्षी मागील वर्षाच्या तुलनेत ३८ दिवस अगोदरच ३६.१९ टक्के मायनस झाले होते.

सध्या उजनी धरणात ९६ टीएमसी पाणीसाठा असल्यामुळे पूर्ण क्षमतेसाठी २७ टीएमसी पाणीसाठा कमी आहे व टक्केवारी ६०.४७ टक्के असल्यामुळे आणखीन ५०.५३ टक्के पाणी जलाशयात असणे अपेक्षित आहे. मागील २०२२ च्या पावसाळ्यात याच दिवसात धरणात १११% टक्के व १२३ टीएमसी पाणीसाठा झालेला होता.